# विनियम

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
व्यवस्थापन समिती, शिर्डी - ४२३ १०९
दिनांक : - जावक नंबर-३३८६
दिनांक-०५/०२/२०२६

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४.

क्रमांक:- एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/ /२०२५ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४) याचे कलम १५ चे पोटकलम २ सह उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे व्यवस्थापन समितीस सेवाप्रवेश विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत. तथापि, सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे व्यवस्थापन समिती नसून तदर्थ समिती कार्यरत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ९८/२०२१ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ८७०७/२०२३ दि.०९/०५/२०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तदर्थ समिती याद्वारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या लेखाशाखा विभागाअंतर्गत **मुख्य लेखाधिकारी**, गट-अ या पदावरील नियुक्ती करीता पुढील विनियम करीत आहे:-

१. (१) या विनियमांना **मुख्य लेखाधिकारी**, गट-अ (सेवाप्रवेश) विनियम, २०२५ असे संबोधण्यात येईल.
(२) ते राज्य शासनाद्वारे संमती दिलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. व्याख्या :-
या विनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षीत नसेल तर, -

(क) "अधिनियम" म्हणजे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४);
(ख) "मुख्य कार्यकारी अधिकारी" म्हणजे अधिनियमातील कलम १३ अन्वये शासनाने नियुक्त केलेले मुख्य कार्यकारी अधिकारी;
(ग) "समिती" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था याची अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटीत करण्यात आलेली व्यवस्थापन समिती;
(घ) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ मुख्य कार्यकारी अधिकारी;
(ङ) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची स्नातक पदवी;
(च) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन;
(छ) "विश्वस्तव्यवस्था" याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटीत करण्यात आलेली विश्वस्तव्यवस्था, असा आहे.

169

३. **मुख्य लेखाधिकारी**, गट-अ नियुक्ती:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या अखत्यारीखालील मुख्य लेखाधिकारी, गट-अ या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र शासन यांच्या सेवेत असलेल्या आणि महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गात सहायक संचालक या पदावर किमान पाच वर्षे सेवा पूर्ण करीत असलेल्या अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीने करता येईल.

अध्यक्ष, तदर्थ समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**REGULATIONS**

**Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi), Shirdi- 423 109.**

Dated the...............2025.

Outward No.3386
Date-05/02/2026

Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004.

No. SSS/WS-GAD/Astha/ /2025 - In exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 15 read with clause (*i*) of section 2 of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004), the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust has the powers to make the regulations regulating the recruitment. However, at present, there is no Management Committee but an Ad-hoc Committee is functioning at Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi. In pursuance of the decision dated 09/05/2024, of the Hon'ble High Court, Bombay, Bench Aurangabad Civil Application No. 8707/2023 in Public Interest Litigation No 98/2021, the Ad-hoc Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust is hereby pleased to make the following regulations regulating the recruitment to the post of the **Chief Accounts Officer**, Group A, in the Accounts Department of Shree Sai Baba Sansthan Trust under the said Act, as follows: -

1. (*1*) These regulations may be called the **Chief Accounts Officer**, Group A (Recruitment) Regulations, 2025.

(*2*) They shall come into force on the date of their sanction by the State Government.

2. In these regulations, unless the context requires otherwise, -

(*a*) "Act" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004);

(*b*) "Chief Executive Officer" means the Chief Executive Officer appointed by the Government under section 13 of the Act;

(*c*) "Committee" means the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust formed under section 5 of the Act;

(*d*) "Competent Authority" means the Chief Executive Officer;

(*e*) "Degree" means a Bachelor's degree of a recognised university;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra;

(*g*) "Trust" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) established under section 3 of the Act.

3. Appointment to the post of the **Chief Accounts Officer**, Group A, in the Trust, shall be by deputation of a suitable officer working for not less than five years as an Assistant Director in the Maharashtra Finance and Accounts Services of the Government.

Chairman, Ad-hoc Committee,
Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi).